




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३०८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१९ जून २०२५


## विठुनामाच्या घोषात श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, देहू (पुणे) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्री क्षेत्र देहू येथील जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान मंदिरात दर्शन घेतले. तसेच याच परिसरातील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर आणि श्रीराम मंदिरात दर्शन घेतले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मंदिरात श्री गणेश पूजन, कलश पूजन, पाद्य पूजन करून पालखीची विधिवत प्रस्थान पूजा व आरती झाली. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील बळीराजा सुखी राहावा, सर्व नागरिकांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात आणि महाराष्ट्राच्या यशाचा झेंडा उंच फडकत राहावा, अशी मनोभावे प्रार्थना केली.



टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात तल्लीन वारकरी... 'ग्यानबा तुकाराम', 'माऊली, माऊली'चा गजर... डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी... अशा भक्तिमय वातावरणात देहू येथून आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. पंढरीच्या वारीसाठी मोठ्या संख्येने वारकरी देहू नगरीत दाखल झाले होते.

दर्शन व पूजेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित वारकरी माऊलींना वंदन केले. मंदिर संस्थानच्यावतीने याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी संस्थानच्या विश्वस्तांशी चर्चा केली. महापुजेनंतर पालखीने इनामदार वाड्यातील मुक्कामाकडे प्रस्थान केले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खा. सुनेत्रा पवार, आ. सुनील शेळके, आ. विजय शिवतारे, आ. शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. गणेश महाराज मोरे, ह.भ.प वैभव महाराज मोरे, ह.भ.प दिलीप महाराज मोरे, विश्वस्त ह.भ.प. विक्रमसिंह मोरे, ह.भ.प.उमेश महाराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे आदी उपस्थित होते.

## पुणे ग्रामीण मुलींमध्ये, परभणी मुलांमध्ये अंतिम विजेते...





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पुणे :** पुणे ग्रामीण यांनी मुलांत,तर परभणी यांनी मुलांत १ल्या आदित्य चषक राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकावले.महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने आमदार सचिनभाऊ अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवशक्ती महिला संघाने या सामन्याचे आयोजन केले होते.

पुणे येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील मॅट वर झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात पुणे ग्रामीणने पिंपरी चिंचवड संघाचा प्रतिकार चुरशीच्या लढतीत ३३-३२ असा संपवत जेतेपद पटकाविले. आक्रमक सुरुवात करीत पिंपरी चिंचवडने पहिला लोण देत १२-०३ अशी भक्कम आघाडी घेतली. पूर्वार्धात १७-०७ अशी आघाडी होती. पण उत्तरार्धात डाव पलटी झाला. पुणे ग्रामीण संघाने उत्तरार्धात जोरदार कम बॅक करीत शेवटच्या काही मिनितात २४-२४ अशी बरोबरी साधली. शेवटी लोण देत २८-२६ अशी आघाडी घेत १ गुणाने बाजी मारली. वर्षा बनसडे, सई शिंदे यांच्या कल्पक चढाया त्यांना सानिका वाकसे ची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला. संतोषी थोरवे, कार्तिक घेरवे यांच्या चढाया उत्तरार्धात कमी पडल्या. सानिका पांडुरे हिचा बचाव ही कमी पडला. म्हणून पिंपरी चिंचवडला निसटत्या पराभवाला सामोरी जावे लागले.

मुलांच्या अंतिम सामन्यात परभणीने औरंगाबाद वर ४१- २१ असा सहज पराभव करीत जेतेपदावर आपले नाव कोरले. विश्रांतीपर्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात परभणी कडे १८- १२ अशी आघाडी होती. पूर्वार्धात एक व उत्तरार्धात २ लोण देत परभणीने हा विजय सोपा केला. सारंग रोकडे, किशोर जगताप यांच्या आक्रमक चढाया त्यांना सोमेश्वर खोपे, जीवन जाधव यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हे शक्य झाले. औरंगाबादच्या नागेश पवार, विराज राठोड, शुभम गवळी यांच्या प्रतिकार उत्तरार्धात कमी पडला.

या अगोदर झालेल्या मुलींच्या उपांत्य सामन्यात पिंपरी चिंचवडने मुंबई उपनगर पूर्वेचे आव्हान ३०-२५ असे संपविले. मध्यांतरापर्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात १६-१२ अशी आघाडी पिंपरी चिंचवड कडे होती. ज्ञानेश्वरी लांडे, संतोषी थोरवे, डिंपल पिंपरी चिंचवड कडून, तर तन्वी बारगडे, भैरवी म्हात्रे, पूजा चिंदरकर उपनगर कडून उत्कृष्ट खेळले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात पुणे ग्रामीणने जालन्याला ३२-१९ असे नमवित अंतिम फेरी गाठली. सई शिंदे, सुहानी माने,सानिका वळसे पुणे ग्रामीण कडून, तर मोनिका पवार, कल्याणी शिंदे जालना कडून उत्तम खेळले. मुलांच्या उपांत्य सामन्यात परभणीने पिंपरी चिंचवडला ४८-३७ असे, तर औरंगाबादने जळगांवला ४०-३७ असे नमवित अंतिम फेरीत धडक दिली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण खासदार व दैनंदिन सामनाचे संपादक संजय राऊत यांच्या हस्ते झाले. तद्प्रसंगी स्पर्धा आयोजक सचिनभाऊ अहिर, सुषमा अंधारे, ॲड.अनिल परब, आदित्य शिरोडकर, राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## वादळी वाऱ्यामुळे केवमध्ये झाड कोसळले...

### चार चाकी, ट्रॅक्टरसह दोन घरे आणि दुकाने उद्धवस्त...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१८, विक्रमगड (पालघर) :** पालघर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने आता वादळी वाऱ्याच्या साथीनं थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी सकाळच्या सुमारास विक्रमगड तालुक्यातील केव (वेडगेपाडा) गावात जोरदार वाऱ्यामुळे निंबाड्याचे एक प्रचंड झाड अचानक कोसळले. या घटनेत चार चाकी, दोन दुचाकी, ट्रॅक्टर, दोन घरे आणि दुकानाचे मोठे नुकसान झाले आहे.

या दुर्घटनेत एक वॅगन-आर कार, एक टाटा मॅजिक वाहन, एक ट्रॅक्टर आणि दोन मोटारसायकली झाडाखाली चिरडल्या गेल्या. याचप्रमाणे, दोन घरांची पत्रे व कौले उडाली असून, एक घर पूर्णतः बाधित झाले आहे. विशेष म्हणजे या घटनेत पालघर जिल्ह्यातील सुप्रसिद्ध आदिवासी हास्य कलाकार रुपेश कडव यांच्या मालकीच्या चारचाकी, मोटारसायकल, ट्रॅक्टरसह त्यांचे घर आणि दुकानाचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



झाड इतक्या जोरात पडले की आवाज ऐकून परिसरातील नागरिक धावले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. घटनेनंतर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.



माझे वाहन, ट्रॅक्टर आणि दुकान उद्धवस्त झाले आहे. रोजच्या उपजीविकेचे सर्व साधन थांबले आहे. प्रशासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी रुपेश कडव आणि त्यांच्या कुटुंबियांनी केली आहे.

दरम्यान, गेल्या पाच-सहा दिवसांपासून पालघर जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली असून, वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे, विजेचे खांब कोसळण्याच्या घटना घडत आहेत. प्रशासनाने नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## थोडक्यात

### भाजप कार्यकर्त्याची हत्या, काँग्रेसच्या सरपंचाला अटक



**अक्षराज : वृत्तसंकलन**


**दि.१८, नागपूर :** नागपूर जिल्ह्यात सोमवारी रात्री घडलेल्या एका निघृण हत्येने संपूर्ण राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. भारतीय जनता पक्षाच्या तरुण ग्रामपंचायत सदस्याची निर्घृण हत्या झाल्यानंतर आता या प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या सरपंचाला अटक करण्यात आल्याने प्रकरणाला गंभीर राजकीय वळण मिळाले आहे. सोमवारी रात्री पिपळा डाकबंगला गावात भाजपचे सक्रिय कार्यकर्ते आणि ग्रामपंचायत सदस्य अतुल पाटील (वय ३२) यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. घटनेनंतर खापरखेडा पोलिसांनी त्वरीत तपासाची चक्रे फिरवत हिमांशू कुंभलकर या तरुणाला अटक केली. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, अतुल पाटील यांनी हिमांशूकडून काही रक्कम उसने घेतले होते आणि या पैशांच्या वादातून हत्या झाली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

मात्र, या प्रकरणाला नाट्यमय कलाटणी मिळाली जेव्हा पोलिसांनी पिपळा डाकबंगला गावाचे सरपंच विष्णू कोकड्डे यांना अटक केली. विशेष म्हणजे, कोकड्डे हे काँग्रेस पक्षाचे स्थानिक नेते असून, ते नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष मुक्ता कोकड्डे यांचे पती आहेत. त्यामुळे एक सत्ताधारी पक्षाचा प्रतिनिधी हा विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्याच्या हत्येप्रकरणी आरोपी ठरल्याने जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, हत्या फक्त पैशाच्या वादातून झाली का, की त्यामागे राजकीय वैमनस्य होते, याचा तपास आता अधिक तीव्रतेने सुरू आहे. पाटील आणि कोकड्डे यांच्यात पूर्वीपासूनच काही राजकीय मतभेद होते का, याचा मागोवा घेण्यात येत आहे. काही स्थानिक नागरिकांनी दोघांमधील तणावाच्या घटनांचा उल्लेखही पोलिसांकडे केला आहे. या प्रकरणामुळे पिपळा डाकबंगला परिसरात सध्या तणावाचे वातावरण आहे. पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला असून कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासन सतर्क आहे.

दोन्ही आरोपींना प्रथम श्रेणी न्यायालयात हजर करण्यात आले असता, अतुल याला २१ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. तर विष्णु कोकड्डे याला १९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या घटनेत आणखी आरोपी सहभागी आहेत काय, याचा तपास ठाणेदार अरविंद कुमार कतलाम व ए.पी.आई. प्रशांत पाटणकर करीत आहेत.

### जेजुरीत भीषण अपघात, ८ जणांचा जागीच मृत्यू



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, पुणे :** पुण्यात अपघाताची मोठी बातमी समोर येत आहे. जेजुरी-मोरगाव रोडवर हा अपघात घडला आहे. या अपघातात ८ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही घटना नेमकी कशी घडली? याबाबत सविस्तर माहिती अद्याप समजू शकलेली नाही. पण या घटनेत मोठी जीवितहानी झाल्याची माहिती मिळत आहे. या घटनेनंतर प्रशासनाकडून बचावकार्याचे सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. जखमींना लवकराच लवकर उपचार मिळावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जेजुरी-मोरगाव मार्गावर पिकअप आणि कारची धडक झाली. या अपघातात एकूण ८ जणांचा मृत्यू झाला आहे. जेजुरीहून बारामतीकडे निघालेली एक कार उभ्या असलेल्या पिकअप टेम्पोला जाऊन धडकली आणि यामध्ये पिकअप टेम्पोमधून साहित्य बाहेर काढणारे, त्याचबरोबर कारमधील काही प्रवासी अशा ८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ५ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये कारमधील ४ जणांचा समावेश आहे, अशी प्राथमिक माहिती देण्यात येत आहेत. जखमींना जेजुरी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेनंतर जेजुरी पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आहे. घटनेतील जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. तर याबाबतचा अधिकचा तपास जेजुरी पोलीस करत आहेत.

**नेमकं काय घडलं?**

जेजुरी - मोरगाव रस्त्यावरील किर्लोस्कर कंपनीजवळील श्रीराम ढाब्यासमोर भरधाव वेगात आलेल्या कारने थांबलेल्या पिकअप टेम्पोला धडक देऊन शेजारीच उभा असलेल्या कारवर आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, जागेवरच आठ जणांचा मृत्यू झाला तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात बुधवारी (दि. १८) सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडला आहे.

सोमनाथ रामचंद्र वायसे, रामु संजीवन यादव (दोघेही रा. नाझरे कप ता. पुरंदर), अजय कुमार चव्हाण (रा. उत्तरप्रदेश) अजित अशोक जाधव (रा. कांजळे, ता. भोर), किरण भारत राऊत (रा. पवारवाडी, ता. इंदापूर), अक्षय शंकर राऊत (रा. झारगडवाडी, ता. इंदापूर) अश्विनी शंकर ऐसार (रा. नागनसूर हेद्रे, सोलापूर) अशी मृतांची नावे असून अन्य एकाची ओळख पटू शकली नाही. तर जखमींची नावेही रात्री उशिरापर्यंत समजू शकली नाही.

## संपादकीय

### ग्रामीण उद्यमशीलतेचा मार्ग

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) कारागीर प्रशिक्षणार्थींच्या कौशल्यांना उद्यमशीलतेकडे नेण्यासाठीचे पाऊल मराठवाड्यात पडत आहे. जालन्यातील हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आणि मराठवाडा ॲक्सलरेटर फॉर ग्रोथ अँड इन्क्युबेशन कौन्सिल (मॅजिक) यांच्या वतीने उचलले जाणारे हे पाऊल कौशल्य विकास, उद्यमशीलता आणि रोजगार निर्मिती यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. उद्योगाच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना मदत करून प्रत्यक्ष नवोद्योग (स्टार्ट अप) स्थापण्यासाठी प्रवर्तन केंद्राची म्हणजेच 'इन्क्युबेशन सेंटर'ची भूमिका महत्त्वाची असते. अशा प्रकारचे; परंतु 'आयटीआय'शी संबंधित देशातील पहिले प्रवर्तन केंद्र जालन्यात निर्माण होत आहे.

सरकारचा कौशल्य विकास विभाग आणि उद्योजक संघटनेच्या पुढाकारातून; तसेच सार्वजनिक आणि खासगी भागीदारीतून (पीपीपी) उभारल्या जाणाऱ्या या प्रवर्तन केंद्राचा लाभ जालना जिल्ह्यातील आठ शासकीय व चार खासगी 'आयटीआय'मधील विद्यार्थी, शिक्षक, नवउद्योजक व स्थानिक उद्योग या सर्वांना होऊ शकेल. या उपक्रमामुळे तंत्रज्ञानावर आधारित नावीन्यपूर्ण उद्योजकतेचा नवा अध्याय मराठवाड्यात सुरू होत असून, या भागातील युवकांसाठी ही बाब प्रेरक ठरेल.

देशातील पहिल्या हरितक्रांती चळवळीत जालन्याचा सहभाग हे वैशिष्ट्य. शेती बियाण्यांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित बियाणे उत्पादनाची पंढरी आणि टाकाऊपासून टिकाऊ निर्माण करणारे उद्योग, लोखंडी, भंगारापासून बांधकामात वापरल्या जाणाऱ्या लोखंडी सळईचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांचे 'स्टील हब' म्हणूनही जालन्याची ओळख आहे. हे सर्व उद्योग जालन्यातील स्थानिक भूमिपुत्रांनी उभारले आहेत. अशा या जालन्यात अत्यंत वेगाने बदलत जाणारे तंत्रज्ञान आणि नवसंकल्पना यातून स्वतःचा उद्योग उभा करू इच्छिणाऱ्या तरुणांना प्रवर्तन केंद्र उपयुक्त ठरेल. राज्य पॉलिटेक्निक, इंजिनीअरिंग आणि सायन्स टेक्नॉलॉजी, कम्प्युटर आदी विषयांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही नवसंकल्पना साकार करण्यासाठी मार्गदर्शन मिळणार आहे.

शासकीय 'आयटीआय'च्या अंतर्गत दहा हजार चौरस फूट जागा या केंद्रासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात येईल. महाराष्ट्र स्टार्टअप धोरणाद्वारे मॅजिक इन्क्युबेशन सेंटरची संकल्पना मांडण्यात आली. शासकीय 'आयटीआय'मधील प्रशिक्षणार्थींनी स्थानिक समस्यांवर आधारित नावीन्यपूर्ण उपाययोजना शोधणे व ग्रामीण भागातील 'स्टार्टअप्स'साठी सक्षम परिस्थिती तंत्र निर्माण करणे हा यामागचा उद्देश. हे केंद्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधन, प्रोटोटायपिंग, मॉडेलिंग व टेस्टिंग लॅब्ससारख्या अत्याधुनिक सुविधा प्रदान करणार आहे. 'मॅजिक' ही संस्था गेल्या आठ वर्षांपासून महाराष्ट्रासह देशातील स्टार्टअप्स, विद्यार्थी, सूक्ष्म-लघुउद्योग व नवउद्योजकांना घडवीत आहे. 'मॅजिक'ने आत्तापर्यंत १४२ स्टार्टअप्सना उद्योग उभारणीत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

केंद्र उभारणीच्या अंतिम टप्प्यात आहे. जालना आणि छत्रपती संभाजीनगर या क्षेत्रांतील मोठे उद्योजक या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन व सहकार्य करणार आहेत. नवसंकल्पना साकार करणाऱ्या युवकांना उद्योग सुरू करण्यासाठीच्या साह्याचा प्रयत्नांना या केंद्रामुळे दिशा मिळेल. यात तंत्रज्ञान, उत्पादन, मार्केटिंग, भांडवल उभारणी, कायदेविषयक सेवा या सगळ्याचे मार्गदर्शन केले जाईल. केंद्राच्या माध्यमातून 'मॅजिक -जालना आयटीआय इनोव्हेशन टेक्निकल चॅलेंज २०२५' या उपक्रमाची सुरवात करण्यात आली आहे. शासकीय 'आयटीआय'मधील विद्यार्थ्यांकडून नावीन्यपूर्ण, तांत्रिक कल्पना मागविण्यात येतील. निवड झालेल्यांना पारितोषिके दिली जातील. उत्कृष्ट संघांना प्रवर्तन केंद्रात मार्गदर्शन व सहाय्य केले जाईल. मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांतही अशी केंद्रे सुरू करायला हवीत. यामुळे स्थानिक प्रतिभावान आणि कुशल युवकांना वाव मिळेल. कौशल्य विकास विभाग आणि मराठवाड्यातील उद्योजक संघटनांनी यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

# आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!



आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली.

गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दिब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नका सांगू कोणाला, चांगले वाग म्हणून...

आता तो काळ राहिला नाही कोणाला चांगले वाग म्हणून सांगण्याचा.कारण कोणाला चांगले वाग म्हणून फुकटचा सल्ला दिला तर तो ऐकून घेईल आणि लगेच चांगले वागू लागला असे काही घडणार नाही.याउलट जर आपण कोणाला चांगले वागण्याचा सल्ला दिला तर तो लगेच प्रतिक्रिया देईल की भावा माझ्या वागण्याचा तुला त्रास होत असेल तर ती तुझी समस्या आहे माझी नाही.मी कसे वागावे हे तू नको सांगू मला.मी चांगलेच वागतो तू कसे वागतोस ते तू बघ.हे बोलणे ऐकल्यावर वाईट वागणाऱ्याला चांगले वाग म्हणून फुकटचा सल्ला न दिलेला बरा.

वाचक मंडळी हे खरे आहे की वाईट वागणे,वाईट बोलणे,वाईट चारित्र्य ठेवणे आणि वाईटांची संगत धरणे हे सर्वांचे आवडते छंद झाले आहेत.बऱ्याच पालकांचे पाल्य शिक्षणाबाबत गंभीर राहिलेले नाहीत.शाळेला किंवा कॉलेजला जात आहे म्हणून घरून निघायचे आणि वाईट,व्यसनी व चारित्र्यहीन मित्रांसोबत कुठे तरी भटकंती करायची.व्यसने करायची, वाईट बाता करायच्या आणि अमूल्य वेळ वाया घालवायचा हे आवडते छंद झाले आहेत.अशा मुलांना कोणी विचारणा केली तर निर्लज्जपणे म्हणतात,ओ अंकल तुम्ही नका आम्हाला शहाणपणा शिकवू,आम्ही काय करू नये व काय करावे हे सांगणारे तुम्ही आमचे कोण?आम्ही आमच्या आईवडिलांना घाबरत नाही तेव्हा तुम्हाला कोण घाबरेल.तुमची वाट पुढे बघून चालायला लागा.दारू पिणाऱ्यांना दारू पिऊ नये,दारू हानीकारक असते म्हणून सल्ला दिला की ते बोलतात कसे,पैसे आमचे,दारू आम्ही पितो त्रास तुम्हाला का होतो?आता यावर न बोलले बरे!

एका घरी बराच वेळ झाला सासू सुनेचे जोरदार भांडण सुरू आहे.ते भांडण ऐकून सगळे शेजारी पूर्णतः वैतागून गेले आहेत. तरीपण ते भांडण सोडवायला कोणी पुढे येण्याचे धाडस करत नाही.सुनेची बाजू घेतली तर सासू खेकसते आणि सासूची बाजू घेतली तर सूनबाई नाराज होते.अशावेळी भांडण सोडवायला न गेलेले बरे! अशी भित्री मानसिकता झाली आहे लोकांची.वडिलांचे निधन झाल्यानंतर शेतीच्या वाटणीसाठी दोन भाऊ भांडण करतात,कोर्टात जातात,दोघेही वकील लावतात, वकीलाची मोठी फी भरतात आणि आपलेच नुकसान करून घेतात. खरेतर शेताच्या वाटणीचा प्रश्न सामंजस्याने ही मिटला असता. माझाच सख्खा भाऊ आहे गेला त्याला थोडा शेतीचा जास्त तुकडा तर काही बिघडत नाही अशी समजूत भावाने भावासाठी घ्यायला हवी होती.पण दोघांचे भांडण आणि दुसऱ्याचा लाभ ही कुत्सित मानसिकता आपण सोडायला तयार नाही!या दोन भावांना गावातील काही लोक चांगला सल्ला देतात पण दोघे भाऊ ऐकायच्या मानसिकतेचे नसतात.शेती वडिलांची,भांडण दोघा भावांचे आणि फायदा परक्या लोकांचा हे गावोगावी सुरू आहे.

कामचुकार व्यक्तीला कामचुकार म्हटले की खूप राग येतो.भ्रष्टाचारी व्यक्तीला भ्रष्टाचारी संबोधले की खूप राग येतो आणि व्याभिचार करणाऱ्या लोकांना चारित्र्यहीन म्हटले की राग येतो.तुम्ही वाईट कृत्ये केले तरीही समाजाने गप्प राहावे अशी तुमची मानसिकता कशासाठी? तुम्ही काहीही वाईट कृत्ये करावे आणि इतरांनी डोळे बंद करून घ्यावेत असे चालणार नाही.तुम्ही नेहमी वाईट वागायचे आणि चांगल्या लोकांनी ते मुकाटपणे सहन करायचे, तुम्हाला नावे ठेवायची नाहीत ही मानसिकता बदला आता. तरीही तुम्हाला राग येतो.आणि तुम्ही चांगल्या लोकांवर बिनबुडाचे आरोप करता,चांगल्या लोकांना नावे ठेवता हे किती योग्य असते याचा विचार तुम्ही वाईट लोक कधीच करत नाही. कोणी चांगले वाग म्हणून सांगितले की तुमच्या अंगाचा तिळपापड होतो!

हे सगळे पाहून चांगल्या लोकांना सल्ला द्यावा वाटतो की ही दुनिया वाईटांनी खचाखच भरलेली आहे.या वाईट लोकांना चांगले वागण्याचा सल्ला अजिबात देऊ नका.चांगल्या लोकांनी वाईट लोकांच्या दुष्कृत्यांकडे लक्ष न दिलेलेच बरे.घाणीने भरलेल्या गटारात धोंडा फेकून अंगावर शिंतोडे उडवून न घेतलेले बरे.एका वाईट व्यक्तीला वाईट म्हटले की सगळे वाईट लोक एकत्र येतात आणि चांगल्या लोकांची बदनामी करतात.ही बदनामी जास्त वेळ टिकत नाही.तरीपण वर म्हटल्याप्रमाणे कोणाला चांगले वागण्याचा सल्ला कधीच देऊ नका,नाक दाबून बुक्यांचा मार सहन करत बसा!आपण कितीही ओरडलो तरीही ही दुनिया बहिरी आहे.इथे वाईटांना डोक्यावर घेऊन नंगानाच चालू आहे. खऱ्याला न्याय नाही असत्य मोकाट आणि सुसाट सुटले आहे!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९५४५४४२६४८.**

### खबरदारी...

उद्घाटन होई साजरे
पूलजरी अपूर्ण तरी
वेळ नाही मग नेत्या
वेळ साधली ही बरी

अमूक नाव पुलाला
प्रत्येक पक्ष हट्ट धरी
वाद विवाद विकोपा
बाजूझेले सर्वतोपरी

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

अस्वस्थ तो ठेकेदार
धडधड चालली उरी
डोळ्यांसमोर स्पष्टते
कामे उरलेली अपुरी

परिपूर्णताप्रमाणपत्र
देऊन बसेअधिकारी
दडपणाखालीमंडळी
जेष्ठआदेश स्विकारी

सोहळाउत्साहे संपन्न
प्रसिद्धीमिळे भरजरी
सत्कारा वंचित राही
कर्मयोगी जी लाजरी

चाले सत्वरी पुलावरी
तुडुंब तुंबली रहदारी
कोसळे पूल धडाडुनी
पावसाच्या येता सरी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# 'नाम'ची तारेल भवसागरी !

महाराष्ट्रभूमीला जसा शौर्याचा आणि पराक्रमाचा वारसा लाभला आहे तसा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ठेवाही लाभला आहे. महाराष्ट्राला साधू संतांची भूमी असे म्हटले जाते. वारकरी संप्रदाय हे महाराष्ट्राचे सर्वात मोठे भूषण आहे आणि आषाढी-कार्तिकी एकादशीनिमित्त केली जाणारी पंढरपूर वारी हा राज्यातील सर्वात मोठा महोत्सव असतो.

आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्यापिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलानोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का ? वारकरी संप्रदायाने या महाराष्ट्राला अनेक संत दिले. विठुरायाच्या भक्तीत लिन होऊन या संतांनी साक्षात विठुरायाला प्रसन्न केले. विशेष म्हणजे जात पात यांच्या पलीकडे भक्ती असते याचा प्रत्यक्ष अनुभव विठुरायाने आपल्या भक्तांना दिला आहे. ज्या काळात स्पृश्य-अस्पृश्यता पाळली जात होती, गरीब श्रीमंती भेदाभेद होता त्याही काळात विविध जातीचे विठुरायाचे भक्त संतपदी विराजमान झाले आहेत. पिढीजात श्रीमंतापासून अत्यंत गरीबही आपल्या भक्तीच्या बळावर विठूमाऊलीला प्रिय ठरला आहे. भगवंताच्या दरबारात जाती पातीला, गरीब श्रीमंती भेदभेदाला कवडीचीही किंमत नाही हेच भगवंताने या उदाहरणांतून दाखवून दिले आहे. विठुरायाच्या भक्तीमध्ये लिन होताना आलेल्या अनुभूती आणि मिळालेले ज्ञान या संत मंडळींनी अभंग, ओवी, गवळण आणि भारूड यांच्या माध्यमातून येणाऱ्या पिढीसाठी साध्या सरळ शब्दांत मांडून ठेवले. या संतांचे साहित्य वाचले कि अध्यात्म किती सोपे आहे याची जाण होते. या समस्त ज्ञानगंगेचे सार म्हणजे भगवंताचे नामस्मरण ! ज्ञानेश्वर माउली म्हणतात 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा श्र पुण्याची गणना कोण करी श्रश्र '.तर तुकोबाराय सांगतात 'नामसंकीर्तन साधन पै सोपे श्र जळतील पापे जन्मांतरीची श्रश्र' सर्वच संतांनी नामस्मरणाची महती त्यांच्या त्यांच्या शब्दात वर्णिली आहे. भगवंताच्या प्राप्तीचा सर्वात सुलभ मार्ग म्हणजे नामस्मरण. वारकऱ्यांना वारीमध्ये शेकडो मैलाचे अंतर चालण्याचे बळ देणारे माध्यम सुद्धा श्री विठ्ठलाचे नाम तर आहे. कलियुगातील हीच सर्वोत्तम साधना आहे, त्यामुळे संतांनी नामाचे महत्व जागोजागी अधोरेखित केले आहे. संत सावता माळी यांनी पंढरीला न जाताही नामाच्या बळावर श्री विठ्ठलाला प्रसन्न केले.

नामसाधना अशी साधना आहे जिला वेळेचे, स्थानाचे आणि काळाचे बंधन नाही. 'रामसे बडा रामका नाम' हे प्रत्यक्ष श्रीरामांनीही वानरसेनेच्या माध्यमातून साऱ्या जगाला दाखवून दिले. अर्जुनाचा अंतर्मनात श्रीकृष्णाचा जप अखंड चालू असे त्यामुळे त्याने सोडलेला बाण लक्ष्यभेद घेई. छत्रपती शिवाजी महाराज सदैव 'जगदंब जगदंब' असा जप करत ज्याच्या सामर्थ्यावर त्यांना पातशाह्यांविरुध्द लढण्यासाठी आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी अध्यात्मिक बळ मिळाले. नामस्मरणाचा महिमा आता विज्ञानाच्या पातळीवर सिद्ध झाला आहे. आत्मा आणि परमात्मा यांचे मिलन घडवून आणणारा दुवा म्हणजे नाम. चार युगाच्या कालखंडातील सध्या कलियुग सुरु आहे. कलियुगातील सामान्य जनावरील व्याप पाहता भगवंताने साधी सोपी नामसाधना सांगितली आहे. केवळ अखंड नामाने कोणीही भगवंताची प्राप्ती करू शकतो. परंतु कलियुगातील रज तमाचे प्रदूषण पाहता नामजपाची अखंडता साधने तितकेही सोपे नाही. त्यासाठी नामाच्या जोडीला सत्संग, सेवा, त्याग, प्रीती(निरपेक्ष प्रेम) यांचे महत्व भगवंताने सांगितले आहे. यांची जोड दिली तर हळूहळू नामाचा संस्कार अंतर्मनावर होऊ लागतो. नामाची अखंडता साधल्यावर चराचरात भगवंताचा वास असल्याची अनुभूती येते, मग भगवंताला भेटण्यासाठी कुठे अन्यत्र जाण्याची आवश्यकताच भासत नाही. भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यामध्ये भगवंत स्वतः भक्ताकडे आला आहे, भगवंताने भक्ताची सेवा केल्याचीही कित्येक उदाहरणे आहेत. दरवर्षी राज्यातील अनेक ठिकाणी मंदिरांतून, मोठमोठ्या मैदानातून विविध महाराज आणि कीर्तनकार यांची कीर्तने, हरिनाम सप्ताह चालतात. या कार्यक्रमांना हजारोंची गर्दी असते. कीर्तन जरी भागवतावर अथवा रामायणावर असले तरी या सर्वाचे सार 'नाम' हेच असते. या किर्तनांत लोक माना डोलावताना, लिन होताना दिसतात मात्र यांपैकी किती जण कीर्तनाचे सार म्हणजेच 'नाम' घेण्याचा प्रत्यक्षात प्रयत्न करतात. अध्यात्म हे कृतीचे शास्त्र आहे. श्रवणभक्तीला अध्यात्मात अल्प महत्व आहे, तर प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्व आहे. कीर्तनात येऊन 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा' म्हणत माना डोलवल्या आणि हरीचे नाम घेण्याचा प्रयत्नच केला नाही, तर देव कसा आपल्याला जवळ करेल ? त्यामुळे कीर्तन प्रवचन हे केवळ ज्ञानार्जनाचे माध्यम नसून कृतिला प्रवृत्त करण्याचे साधन आहे, घरी चित्रपट आणि सासू सूनांचे कार्यक्रम पाहत बसण्यापेक्षा कीर्तन प्रवचनांना जाणे नक्कीच श्रेष्ठ आहे; मात्र अध्यात्मात पुढे जायचे असेल, त्यातील आनंद मिळवायचा असेल, तर नामस्मरणाशिवाय पर्याय नाही. हरिपाठ हजारदा म्हटला आणि माऊलीने सांगितलेले हरी नाम घेतलेच नाही तर माउलींना तरी आवडणार आहे का ? नामस्मरण हा साधनेचा पाया आहे त्यामुळे अध्यात्माची गोडी चाखायची असेल तर नियमितपणे नामस्मरण करण्याला पर्याय नाही.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शाळेवर कोसळला जुना वृक्ष ; शाळेच्या वर्ग खोल्या मोडकळीस... विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर !

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.१८, हिमायतनगर :** येथील जिल्हा परिषद शाळेवर जुना आणि धोकादायक वृक्ष अचानक कोसळल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. सुदैवाने घटनेच्या वेळी वर्गात मुले नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र या प्रकारामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

तसेच कामारी येथील ही शाळा १९३४ मधील बांधकाम निजाम कालीन असून शाळेच्या खोल्या ह्या अतिशय जीर्ण तसेच मोडकळीस आल्या आहेत.

कामारी येथील सुज्ञ पालकांनी अनेक वेळा या संदर्भात प्रशासनाशी निवेदन तथा तोंडी सूचना देऊन देखील याकडे लक्ष दिले जात नाही. सध्या वादळी वाऱ्यामुळे शाळेच्या वर्गखोल्यांची अवस्था देखील बिकट झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शाळेच्या परिसरात काही जुन्या झाडांची स्थिती तसेच मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या यांची अवस्था धोकादायक झाली होती. याबाबत शिक्षक व पालकांनी प्रशासनाला वारंवार सूचना दिल्या होत्या. मात्र योग्य ती कारवाई न झाल्यामुळे अखेर एक मोठा वृक्ष कोसळण्याची घटना घडली.

ग्रामस्थांनी आणि पालकांनी यासंदर्भात संताप व्यक्त करत तातडीने परिसरातील धोकादायक वृक्ष तोडण्याची मागणी केली आहे. तसेच तात्काळ प्रशासनाने सदरील शाळेच्या वर्ग खोल्यांचे बांधकाम करून शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात येत आहे.

## ईगल ९३०५ सोयाबीन बियाणे उगवले नाही... शेतकरी तिमापुरे यांची प्रशासनाकडे तक्रार

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.१८, हिमायतनगर :** हिमायतनगर येथील शेतकरी बालाजी तिमापुरे यांना त्यांच्या शेतात पेरलेल्या सोयाबीनच्या बियाण्यामुळे मोठ्या आर्थिक फटक्याचा सामना करावा लागत आहे. त्यांनी पळशीकर ट्रेडिंग कंपनी येथून ईगल ९३०५ या कंपनीचे १८ बॅग सोयाबीन बियाणे खरेदी करून जून महिन्याच्या सुरुवातीस पेरणी केली होती. समाधानकारक पावसामुळे पेरणी योग्य वेळी झाली.

असे असतानाही आजपर्यंत शेतात सोयाबीन उगवलेच नाही, असा गंभीर आरोप तिमापुरे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी हिमायतनगर तहसिलदार, कृषि अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन दिले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेतात भेट देऊन बियाणे उगवले नाही याची चौकशी करावी आणि न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात त्यांनी बियाणे खरेदीची पावती क्र. १८५ देखील नमूद केली आहे.

या प्रकरणामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गामध्ये चिंता व्यक्त होत असून, निकृष्ट बियाणेमुळे होणारे नुकसान थांबवण्यासाठी प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळावा, अशी मागणी आता ग्रामस्थ आणि शेतकरी संघटनांकडूनही होऊ लागली आहे.

## आठवडी बाजारात मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पालम (परभणी) :** पालम येथे शनिवारी सर्वात मोठा आठवडी बाजार भरतो या आठवडी बाजारात मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले आहे. पालम येथे दर शनिवारी मोठया प्रमाणात आठवडी बाजार भरतो या बाजारात जीवनावशक्य वस्तू खरेदी करण्यासाठी पालम तालुक्यासह परिसरातील नागरिक, विक्रेते, व्यापारी मोठया प्रमाणात येतात त्यामुळे मोठया प्रमाणात गर्दी होते. याच गर्दी चा फायदा घेत भुरट्या चोरांनी चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे यामध्ये अनेक नागरिकांचे मोबाईल, पाकिटे, पैसे चोरीस जात आहेत. दि.१४ शनिवार रोजी सामाजिक कार्यकर्ते गजानन देशमुख बाजार करत असतात चोरट्यांनी ४० हजार रुपये किंमत असलेला मोबाईल चोरट्यानी लंपास केला.

मागील काही दिवसात पालम शहरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे यामध्ये एटीएम फोडी, घरफोडी सारख्या घटना घडल्या आहेत यामुळे शहरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण असून पालम पोलिस प्रशासनाने चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

गेल्या काही दिवसापासून शनिवार बाजारातील मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले आहे, यामध्ये माझाही चाळीस हजार रुपयांचा मोबाईल लंपास केला आहे, वरिष्ठांनी लक्ष घालून धुमाकूळ घालणाऱ्या भुरट्या चोरांचा तात्काळ बंदोबस्त करावा व शनिवारी आठवडी बाजारात पोलिसांची गस्त वाढवावी.

**-- गजानन देशमुख (सामाजिक कार्यकर्ते, पालम.)**

## पाऊस नसाल्यामुळे शेतकरी चिंतेत...

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१८, पानगाव :** ८ जूनला मृग नक्षत्र निघाले परंतु मृग निघाल्या पासून पेरणी सारखा व शेतकऱ्यांना समाधान कारक असा पाऊस रेणापूर तालुक्यात पडला नाही मे महिन्याच्या शेवट च्या आठवड्यात चांगला पाऊस झाला होता. शेतकऱ्यांना आशा होती यंदा लवकर पाऊस पडून पेरण्या होतील परंतु गेल्या १० दिवसा पासून पावसाने उगाड दिल्या मुळे बळीराजा चिंतेत आहे. करण मे महिन्यात पडलेल्या पाऊसा मुळे काही शेतकऱ्यांनी पेरणी ला सुरुवात सुद्धा केली. परंतु आता पावसाने उघाड दिल्यामुळे ते शेतकरी सुद्धा अडचणीत आले आहेत. गेल्या वर्षी १जून पासून रेणापूर तालुक्यात चांगला पाऊस झाला होता. त्यामुळे पेरणी ला लवकर सुरुवात झाली होती परंतु या वर्षी मे महिन्यात अवकाळी पावसाने जोर चांगला धरला होता. मृग नक्षत्र निघाल्या पासून समाधान कारक पाऊस पडला नाही.

१० –१५जून पासून सुरु होणाऱ्या पेरण्या यंदा लांबनीवर पडणार असं वाटत आहे. ज्या शेतकऱ्यां पेरणी केली आहे त्यांना सुद्धा आता चिंता लागली आहे. तरी काही शेतकऱ्यांनी येत्या ४ – ५ दिवसात पाऊस पडेल या आशे ने प्रेरणी ला सुरुवात केली आहे. मे महिण्यात गरज नव्हती तेव्हा भरपूर पाऊस झाला. परंतु आता पावसाची गरज आहे पाऊस पडत नाही. निसर्गराजा परत शेतकऱ्यांना आभाळा कडे बगायला लावतो काय की अस शेतकरी म्हणत आहेत.

## मुंबई रंगमंचावर कलगी तुऱ्याचा श्री गणेशा; दिलीप नामे आणि सहकारी आयोजनाचे मानकरी



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१८, मुंबई :** महाराष्ट्र विविध लोककला लोप पावत असताना कोकणात वाडी वस्तीवर जोपासलेली कलगी –तुरा ही लोककला मुंबई नाट्यगृहात हाऊसफुल्ल गर्दी खेचत मनोरंजनाचे मुख्य केंद्र बनली आहे, मंगळवार दिनांक १७ जून २०२५ रोजी मास्टर दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह विलेपार्ले (मुंबई) येथे श्री जय गणेश मित्र मंडळ, दिलीप नामे आणि सहकारी आयोजित या मोसम ातील कलगी तुऱ्याच्या जंगी सामना शुभारंभ प्रयोगाला रसिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली, कोकणातील नामवंत कलगीवाले शाहीर सचिन कदम (खेड)आणि तुरेवाले शाहीर देवेंद्र झिमन (लांजा) या दोन शाहिरांत ही कलगीतुऱ्याची जुगलबंदी रसिकांना पाहायला मिळाली. दोन्ही शाहिरांनी सोज्वळ कलगी तुरा सादरीकरणावर भर दिला.

गेली अनेक वर्षे मुंबई रंगमंचावर कोकणातील नमन आणि कलगीतुरा लोककला व लोककलावंतांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे श्री जय गणेश मित्र मंडळ दिलीप नामे आणि सहकारी मंडळी आयोजनात सातत्य राखत कोकणातील लोककलांच्या संवर्धनात मोठे योगदान देत आहेत. प्रतिवर्षी नमन आणि कलगीतुरा लोककलांचे शुभारंभ प्रयोग आयोजन करण्यात दिलीप नामे आणि सहकारी मंडळी अव्वल स्थानी आहेत. त्यांच्या आयोजनाला रसिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सदर कलगीतुरा कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रयोगाला सम ाजसेवक दिनेश कुरतडकर आणि सहकारी, कलगीतुरा समाज उन्नती मंडळ (मुंबई) संस्थेचे सचिव सुधाकर मास्कर, खजिनदार सत्यवान यादव, चंद्रकांत धोपट, अनंत मुंगळे, सुरेश चिबडे, दामोदर गोरीवले आदी पदाधिकारी तसेच तुषार पंदेरे मंगेश यादव, विकास लांबोरे, काशिनाथ गोरुले, विनोद फटकरे, उदय चिबडे, उमेश पोटले, पत्रकार दिपक कारकर आदी कोकण कला विश्वातील तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## महाबळेश्वर नगरपरिषद शाळा दर्जात्मक शिक्षणाचे व गुणवत्तेचे केंद्र



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१८, महाबळेश्वर :** महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या वतीने मागील शैक्षणिक वर्षात म ातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक भौतिक सुविधा मिळाव्यात म्हणून आकर्षक, सुसज्ज शालेय इमारती, वर्गनिहाय अभ्यासक्रमावर आधारीत बालापेटिंग्ज, विद्यार्थी वयोगटानुसार बेंच व्यवस्था, डिजीटल क्लासरूम, इंटरनेट सुविधा, पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर प्यूरीफायर, विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने केवळ शालेय परिसरातच नव्हे तर प्रत्येक वर्गामध्ये सी सी.टि.व्ही यंत्रणा, विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध स्पर्धा, क्रीडा महोत्सव इ.गोष्टींची उपलब्धता नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

त्यामुळे आता आपल्या पाल्यास नगरपरिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश देण्याची जबाबदारी ही प्रत्येक म हाबळेश्वरवासीयांची असून शाळेत दाखल विद्यार्थ्यांच्या सर्वागीण शैक्षणिक गुणवत्तेसाठी आपले १००%, योगदान देणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य आहे असे नगरपरिषद शाळा क्र.१ व शाळा क्र. २ महाबळेश्वर मधील १ लीच्या वर्गात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या निमित्ताने मा.मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी प्रतीपादन केले.

महाबळेश्वर नगरपरिषदेच्या शाळा क्र.१ व शाळा क्र.२ मधील प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने नवागत स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. इ.१ ली मध्ये दाखल विद्यार्थी व त्यांचे पालक यांची ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढणेत आली. मा. मुख्याधिकारी पाटील यांचे शुभहस्ते सर्व मुलामुलींना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करीत स्वागत करण्यात आले. या छोट्या चिमुकल्यांच्या ज्ञानमंदिरातील प्रवेशाच्या पहिल्या पावलाचा ठसा पालकांना भेट देणेत आला त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशिनी नागराजन यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आपले विदयार्थी दाखल करण्यासाठीचे आवाहन पत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पालकांना वितरीत करणेत आले. इयत्ता पहिलीमध्ये दाखल सर्व विद्यार्थ्यांना शालेय मोफत गणवेश, बूट व मोजे पाठ्यपुस्तके शालोपयोगी साहित्य, आणि खाऊचे वाटप करणेत आले.

यानिमित्ताने पीएमश्री योजनेअंतर्गत न.पा. शाळा शाळा क्र. २ महाबळेश्वर येथील अत्याधुनिक, सुसज्ज खगोल शाळा वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी नगरपालिकेचे वरिष्ठ लिपिक आबाजी ढोबळे, अर्बन बँकेचे व्यवस्थापक फकिरभाई वलगे ,सेवानिवृत्त वरिष्ठ मुख्याध्यापक संजय ओंबळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ डोईफोडे, पत्रकार रियाज मुजावर, राहुल शेलार काळे लिपिक, दत्ता वागदरे, शाळा क्र.१ व २ चे मुख्याध्यापक, शिक्षक व पालक बहुसंखेने उपस्थित होते. शाळा क्र.१च्या मुलानी ईशस्तवन व शाळा क्र.२ मधील १ ली तील चिमुकल्यांनी बालगीत सादर केले. प्रास्ताविक यशवंत गोळे यांनी केले व आभार जनार्दन कदम आणि सूत्र संचालन संतोष शिंदे यांनी केले.

## बेलापूर टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टच्या प्रक्रियेची आयुक्तांकडून पाहणी



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** म हानगरपालिका क्षेत्रात ७ मलप्रक्रिया केंद्रे असून त्यामधील कोपरखैरणे व ऐरोली मलप्रक्रिया केंद्रात प्रत्येकी २० द.ल.लि. क्षमतेचे तसेच नेरूळ येथे ५.० द.ल.लि. क्षमतेचे टर्शिअरी ट्रिटमेंट प्रकल्प कार्यान्वित असून त्यामधील १७ द.ल.लि. पाणी ६४ उद्योगसमुहांना पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी दिले जाते.

त्यामध्ये अधिक भर घालत केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत नमुंमपा क्षेत्रात सेक्टर १२, सीबीडी बेलापूर येथील मलप्रक्रिया केंद्रात ७.५ द.ल.लि. क्षमतेचा टर्शिअरी ट्रिटमेंट प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा नवीन प्रकल्प अंतिम टप्प्यात असून त्याची चाचणी घेतली जात आहे. सदर प्रकल्पाची आज प्रत्यक्ष पाहणी करत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी कामांना गती देऊन हा प्रकल्प जलद कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून नागरी भागातील सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया हे उद्दिष्ट साध्य होणार असून येथे तयार होणारे पुनर्प्रक्रियाकृत पाणी बेलापूर विभागातील विविध उद्याने तसेच रस्ते, दुभाजक, वाहने यांची स्वच्छता व इतर वापरासाठी होणार आहे. याम ुळे पिण्याच्या शुध्द पाण्याची बचतही होणार आहे. सदर पाणी आवश्यक त्या ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे यादृष्टीने पाईपलाईन व इतर अनुषांगिक बाबीचे नियोजन करावे व पुनर्प्रक्रियाकृत पाणी वापराचा कृती आराखडा तयार करावा असेही निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले. यावेळी शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, कार्यकारी अभियंता म दन वाघचौडे व वसंत पडघन, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ. अमोल पालवे उपस्थित होते.

या प्रसंगी आयुक्तांनी टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टच्या कार्यप्रणालीचे अवलोकन केले. त्याच्या प्रक्रियेविषयी बारकाईने माहिती घेतली व येथील पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा जास्तीत जास्त वापर करावा आणि पिण्याच्या शुध्द पाण्याची बचत करावी अशा सूचना केल्या.

## जमिनीच्या वादातून चेकचा गैरवापर, दोघा भावांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.१८, धाराशिव :** जमिनीचा वाद सुरू असताना बिशीच्या व्यवहारात तारण म्हणून घेतलेल्या चेकचा गैरवापर करून फसवणूक केल्याप्रकरणी दोघा भावांवर ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत वसंत वराळे आणि प्रवीण वसंत वराळे (दोघे रा. मुळेवाडी, ता. जि. धाराशिव) अशी आरोपींची नावे आहेत.

याप्रकरणी उत्रेश्वर प्रभू वराळे (वय ४१, रा. मुळेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी उत्रेश्वर वराळे आणि आरोपी प्रशांत व प्रवीण वराळे यांच्यात जमिनीचा वाद न्यायालयात प्रलंबित आहे. दरम्यान, २०१४ ते २०१६ या कालावधीत त्यांनी मुळेवाडी येथे खाजगीरीत्या दरमहा एक हजार रुपयांप्रमाणे ५० सदस्यांची बिशी चालवली होती. या बिशीच्या व्यवहारापोटी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी उत्रेश्वर यांच्याकडून तारण म्हणून एक कोरा चेक घेतला होता. जमिनीचा वाद सुरू असल्याचा फायदा घेत आरोपींनी या चेकवर स्वतःच्या सोयीनुसार नाव, रक्कम आणि तारीख टाकून धनादेशाचा गैरवापर केला. या बिशीच्या व्यवहारापोटी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी उत्रेश्वर यांच्याकडून तारण म्हणून एक कोरा चेक घेतला होता. जमिनीचा वाद सुरू असल्याचा फायदा घेत आरोपींनी या चेकवर स्वतःच्या सोयीनुसार नाव, रक्कम आणि तारीख टाकून धनादेशाचा गैरवापर केला. या माध्यमातून स्वतः ला आर्थिक फायदा मिळवून फिर्यादीची फसवणूक केली.

हे प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, धाराशिव यांच्याकडे गेल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार, दिनांक १६ जून २०२५ रोजी ढोकी पोलीस ठाण्यात प्रशांत वराळे आणि प्रवीण वराळे या दोघांविरुद्ध भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४६७ (किंमती रोख्याची बनावट), ४६८ (फसवणुकीसाठी बनावटगिरी), ४७१ (बनावट दस्तऐवज खरा म्हणून वापरणे) आणि ३४ (समान उद्देश) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## वाशी सार्वजनिक रूग्णालय शवागारातील तक्रारीवरील कारवाईबाबत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** वाशी सार्वजनिक रूग्णालय येथील शवागारात कार्यरत कर्मचारी याच्याविषयीची तक्रार विविध माध्यमांतून प्राप्त झालेली असून त्या अनुषगाने महापालिका आरोग्य विभागामार्फत तातडीने कारवाई करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक रूग्णालय, वाशी येथे मे. केएचएफएम हॉस्पिटल अँड मॅनेजमेंट सर्व्हिसेस लि. या बाह्य यंत्रणेव्दारे यांत्रिकी पध्दतीने साफसफाई व बहुउद्देशीय सेवा पुरविणे या कामासाठी बहुउद्देशीय कामगार पुरविण्यात आलेले आहेत.

त्यामधील चित्रफितीत दिसणारा शवागरातील बहुउद्देशीय कामगार हा बाह्य यंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेला असल्याने संबंधित ठेकेदारास सदर बहुउद्देशीय कामगारास कामावरून काढून टाकणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे तसेच ठेकेदारास या प्रकाराची गंभीर नोंद घेऊन यापुढील काळात सतर्क राहण्याची समज देण्यात आलेली आहे.

# सावनेरच्या धर्तीवर चंद्रपूरला मिळणार निसर्गसंपन्न इको पार्क

## आ. जोरगेवार यांनी केली जागेची पाहणी...



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** शहरात पर्यावरणपूरक पर्यटन आणि नागरिकांसाठी निसर्गस्नेही जागा उपलब्ध व्हावी, या हेतूने सावनेर येथील इको पार्कच्या धर्तीवर चंद्रपुरमध्ये इको पार्क उभारण्याच्या दृष्टीने आ. किशोर जोरगवार यांनी पुढाकार घेतला असून, मंगळवारी त्यांनी वेकोलिच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेत संभाव्य इको पार्कच्या जागेची पाहणी केली आणि इको पार्क साकारण्यासाठी सूक्ष्म नियोजन करीत प्रक्रिया गतिशील करण्याचा निर्देश दिला.

यावेळी वेकोलिचे योजना अधिकारी प्रिया शंकर विना, अमला खनन ऑफीसर उज्वल बोढे, लालपेठ उपक्षेत्रीय प्रबंधक मुश्ताक अहमद, पर्यवेक्षक अधिकारी शुक्ला, सुभाष ताजने, भाजपाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, तुषार सोम, दशरथसिंह ठाकूर, प्रकाश देवतळे, बलराम डोडाणी, रवी गुरनुले, आदींची उपस्थिती होती.

आ. जोरगेवार यांनी नुकतीच नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील इको पार्कला भेट देऊन तेथील मॉडेलची पाहणी केली होती. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांसोबत त्यांनी पार्कची रचना, संकल्पना आणि व्यवस्थापन यांचा सविस्तर अभ्यास केला. सावनेर इको पार्कमध्ये साकारण्यात आलेली कोळसा खाणीविषयक वेकोलिची माहितीपर प्रदर्शनी, हरित पट्टे, जलाशय आणि पर्यावरण संवर्धनाची आधुनिक तंत्रे यांचा अनुभव घेऊन जोरगेवार यांनी चंद्रपूरमध्येही असेच आधुनिक आणि निसर्गाभिमुख इको पार्क उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. दरम्यान, मंगळवारी चंद्रपूर येथील वेकोलिच्या विश्रामगृहात झालेल्या बैठकीत त्यांनी वेकोलि आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करत प्रारंभिक आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीनंतर आ. जोरगेवार यांनी प्रत्यक्ष पाहणीसाठी शहरातील जमनजट्टी परिसरातील वेकोलिच्या मालकीच्या जागेची पाहणी केली. या भागातील रिवलबेल्ट कॅारी याचीही पाहणी केली. येथे जुनी खुली कोळसा खाण असून, त्यात पावसाचे आणि नंदीचे पाणी साचले आहे. हे निळ्या रंगाचे पाणी असून, येथे नैसर्गिक जलसाठा निर्माण झाला आहे. त्यातून एक सुंदर निसर्गरम्य जलाशय तयार झाला आहे. परिसरात घनदाट वृक्षराजी, जलचर आणि पक्ष्यांचे अस्तित्व लक्षात घेता ही जागा नैसर्गिक इको पार्कसाठी अत्यंत अनुकुलित स्थान असल्याचे आ. जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# स्वस्त धान्य दुकानदारांचे थकीत कमिशन देण्याची कार्यवाही करावी - मंत्री छगन भुजबळ



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, ठाणे :** राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे मागील थकीत कमिशन अदा करण्याची कार्यवाही करावी. केंद्राचा निधी प्राप्त झाल्यानंतर राज्याला द्यावयाचा हिस्सा तातडीने देवून कमीशन अदा करावे, असे निर्देश अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिले आहेत.

मंत्रालयात नागपूर व रत्नागिरी जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्यांबाबत आयोजित बैठकीत मंत्री भुजबळ बोलत होते. बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रधान सचिव विनीता वेद सिंघल, रत्नागिरी जिल्हा बैठकीस आमदार शेखर निकम, नागपूर स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष बाबा आष्टणकर उपस्थित होते. रत्नागिरी बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे अध्यक्ष कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी उपस्थित होते. अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ म्हणाले, केंद्र शासनाशी संबंधीत विषयांबाबत विभागाने सर्वंकष माहिती तयार करावी. यासंदर्भात लवकरच दिल्ली येथे केंद्रीय अन्न नागरी पुरवठा मंत्र्यांसमवेत बैठक घेण्यात येईल. रेशनकार्ड शोध मोहीम राबविण्यात यावी. या मोहिमेत अपात्र ठरलेल्या शिधापत्रिकाधारकांचे धान्य वितरण बंद झाल्यास धान्याचा कोटा वाढविणे शक्य होईल. धान्य दुकानदारांना प्रति क्विंटल कमिशन वाढ करण्याचा प्रस्ताव तयार करावा, अशा सूचनाही अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांनी दिल्या.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, स्वस्त धान्य दुकानदारांना ओळखपत्र देण्यात यावे. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांना प्राधिकृत करावे. तसेच ऑफलाईन धान्य वितरणाची परवानगी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा.

# १४ वर्षांचा मुका मुलगा अपहरण – नागरिकांना सहकार्याची विनंती



**अक्षराज : विनोद गिरी**

**दि.१८, कल्याण :** कल्याण पूर्व येथील आडीवली परिसरातून एका १४ वर्षीय मुक्या मुलाचे अपहरण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत मानपाडा पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ५१८/२०२५, भा.दं.वि. कलम १३७(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अपहृत मुलाचे नाव कु. दशरथ वकील राठोड असून तो दिनांक १५ मे २०२५ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास त्याच्या राहत्या घरातून खेळायला जातो असे सांगून बाहेर पडला आणि परत घरी परतला नाही. मुलगा बोलता येत नसून मुका आहे. केवळ आई, बाबा, दिदी एवढेच बोबडे बोलतो.

**मुलाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:**

- वय : १४ वर्षे
- अंगकाठी : सडपातळ
- रंग : सावळा
- चेहरा : उभट
- उंची : सुमारे ५ फूट
- केस व डोळे : काळे
- अंगावर : लाल-पिवळा टी-शर्ट, चॉकलेटी रंगाची पॅन्ट
- पायात : गुलाबी रंगाची चप्पल

सदर मुलाचा शोध फिर्यादी सौ. जगदेवी वकील राठोड (वय ३९, राह. बाबू चक्कीवाला चाळ, आडीवली, कल्याण पूर्व) यांनी विविध ठिकाणी घेतला; मात्र तो कुठेही आढळून आला नाही. त्यामुळे पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून त्याचे अपहरण केले असावे असा संशय आहे.

कोणालाही सदर वर्णनाचा मुलगा आढळल्यास किंवा त्याच्याविषयी कोणतीही माहिती असल्यास कृपया खालील क्रमांकांवर संपर्क साधावा:

मानपाडा पोलीस स्टेशन – ०२५१-२४७०१०४

सपोनि शिवाजी बडे – ९५९४६१२५५५

पोलीस प्रशासन तसेच मुलाच्या पालकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या बाबतीत कुठलीही माहिती मिळाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, जेणेकरून मुलाचा लवकरात लवकर शोध घेता येईल.

# पारनेर तालुक्यातील उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाला मंजुरी...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर :** पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार, पुणेवाडी, राळेगणसिद्धी आणि जातेगाव या उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाला अखेर जलसंपदा विभागाकडून मंजुरी मिळाली आहे. या यशामुळे राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. सर्वेक्षणाला मंजुरी मिळाल्यामुळे पारनेर तालुक्यातील दुष्काळी भागातील पाणीप्रश्न सुटण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

> थोर समाजसेवक पद्मभूषण डॉ. आण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा लढा लढला गेला. पारनेच्या दुष्काळी भागाला पाणी मिळावे,ही आमची मुख्य भूमिका आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमच्या मागणीचा विचार करून हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने केली आहे.
>
> **-- संतोष वाडेकर**
> **(अध्यक्ष, भूमिपूत्र शेतकरी संघटना)**

भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून, या योजनेच्या सर्वेक्षणासाठी ८ लाख ३५ हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.या यशाबद्दल खऱ्या अर्थाने राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांचे भूमिपुत्र शेतकरी संघटनेतर्फे स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले. या योजनेमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांनी या लढ्याला मोठा पाठिंबा दिला असून, सर्वेक्षणानंतर ही योजना लवकर पूर्ण होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

यावेळी संघटनेचे संपर्कप्रमुख अशोक आंधळे, बाळशिराम पायमोडे, संतोष वाबळे, प्रवीण खोडदे, मनोज तामखडे, बाळासाहेब वाळुंज, अन्सार पटेल, अनिल सोबले, रघुनाथ मांडगे, सुभाष करंजुले, संजय भोर, अरुण बेलकर, मंजाबापू वाडेकर, अविनाश देशमुख, वसंत साठे, गोरख पठारे, नंदु साळवे, राहुल गुंड, शरद बालवे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या यशामुळे पारनेर तालुक्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी नवीन आशा निर्माण झाल्या आहेत.

## मांस विक्रेत्यांच्या जनजागृतीसाठी नवी मुंबईत माहितीप्रद कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** नमुंमपा कार्यक्षेत्रामधील कुक्कुट, शेळी / मेंढी मांस विक्रेते यांच्या जनजागृतीसाठी मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयातील पशुवैद्यकीय सामुहिक स्वास्थ विभागामध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कापणी पश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान योजना कार्यरत आहे.

या योजनेंतर्गत स्वच्छ आणि सुरक्षीत कुक्कुट, शेळी / मेढीं मांस उत्पादन करण्याकरिता तंत्रज्ञान विकसीत करण्यात आले आहे. या तंत्रज्ञानाविषयी नमुंमपा कार्यक्षेत्रातील मांस विक्रेत्यांना माहिती देण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय परेल आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमध्ये नमुंमपा कार्यक्षेत्रातील मांस विक्रेते मोठया प्रमाणात सहभागी झाले होते.

सदर कार्यशाळेचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक व योजना प्रमुख डॉ.रविंद्र झेंडे यांनी स्वच्छ मांस निर्मितीसाठी विकसीत तंत्रज्ञानाचे सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी व्यवसाय वृद्धीकरिता योग्य उपाय सांगून उपस्थित मांस विक्रेत्यांना प्रेरणा दिली.

# थोडक्यात

## कुर्ला गांधी बाल मंदिर शाळेत विद्यार्थ्यांचा आनंदात प्रवेशोत्सव



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** कुर्ला पश्चिम येथील गांधी बाल मंदिर शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शाळेच्या पहिल्याच दिवशी खूप पाऊस पडत होता तरीही विद्यार्थ्यांची उपस्थिती छान होती. प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार गणेश हिरवे यांनी शाळेचे मुख्याध्यापक अनिल पांचाळ, एनसीसी प्रमुख शिक्षक विश्वनाथ पांचाळ आणि इतर शिक्षक वृंदाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले आणि मुलांना पुस्तक वितरित केली. मुलांशी संवाद साधताना हिरवे यांनी आपली नियमित कामे आपण न चुकता केली पाहिजेत तसेच घरी देखील अभ्यासा बरोबरच आई वडिलांना मदत करून या देशाचे एक चांगले नागरिक बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले. शाळा हे देशाचे उत्तम नागरिक बनण्याची पवित्र वास्तू असून शिक्षक, पालक विधार्थी हे घटक शाळेचे कणा असल्याचे सूतोवाच केले. या शाळेत वर्षभर विविध उपक्रम चांगल्या पद्धतीने राबविण्यात येतात.शाळेत येणारी मुलं गरीब आणि मध्यमवर्गीय असली तरी अभ्यासात आणि खेळात हुशार असून एन सी सी मधील अनेक विधार्थी सैन्यात दाखल झाल्याचे मुख्याध्यापक अनिल पांचाळ म्हणाले.

## ट्रॅक्टरमधून भव्य स्वागताने आनंद गगनात मावेना !




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी सजविलेल्या ट्रॅक्टरमध्ये बसवून ढोल ताशांच्या गजरात गावातून भव्य मिरवणूकीने स्वागत करण्यात आले. यामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेना अशी अवस्था झाली. शाळेचे मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे शिक्षक दत्ता रोकडे व संदीप झावरे, प्रितम बर्वे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यां बरोबर पालकही अचंबित झाले.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी ट्रॅक्टरला फुग्यांची व फुलांची सजावट करण्यात आली. पहिलीतील सर्व विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून प्रवेशद्वारावर औक्षण करून स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेचे प्रांगण मुले आणि फुलांनी फुलले होते. काही हसत काही रडत मुले शाळेत आली.

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश वाटप करून सर्व विद्यार्थ्यांना गोड लापशी, सांबार भात अश्या प्रकारे स्वादिष्ट भोजन देण्यात आले.

याप्रसंगी पारनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दयानंद पवार, सरपंच कमलताई गागरे, कैलास गागरे, ग्राम. पं. सदस्य गौतम बागूल, ग्राम. पं. सदस्या पुजा गागरे, चेअरमन तुकाराम जाधव, व्हा .चेअरमन भाऊसाहेब गागरे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव, माजी अध्यक्ष संतोष बागुल, ग्रामविकास अधिकारी दातीर, रावसाहेब गागरे, भाऊसाहेब पांडुरंग गागरे उपस्थित होते. मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे, संदिप झावरे, दत्तात्रय रोकडे, संदिप गाडे,शिक्षिका प्रितम बर्वे, लता शिरसाठ यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## महावितरण कंपनीनेचे विंचूर विद्यालयात बक्षीस वितरण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** महावितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा दि.५ जून गुरुवार रोजी संपन्न झाल्या होत्या. लासलगाव महावितरण उपविभागा अंतर्गत या चित्रकला व निबंध स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला व निबंध स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यानं मधून चित्रकला व निबंध स्पर्धेचा निकाल काढून प्रत्येकी १ ते ३ क्रमांक काढण्यात आला.

**चित्रकला स्पर्धेत खालील प्रमाणे क्रमांक काढण्यात आले.**

१. स्नेहल चौधरी – प्रथम क्रमांक
२. साईशा खैरे – द्वितीय क्रमांक
३. किरण नेवगे – तृतीय क्रमांक

तसेच निबंध स्पर्धेत खालील प्रमाणे ३ क्रमांक काढण्यात आले.

१. जान्हवी डुंबरे– प्रथम क्रमांक
२. समीक्षा जाधव – द्वितीय क्रमांक
३. श्रावणी गोराडे – तृतीय क्रमांक

या स्पर्धेसाठी चा बक्षीस वितरण कार्यक्रमास लासलगाव उपविभागातील खालील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.उपकार्यकारी अभियंता दत्तात्रय पुंडे, सहाय्यक अभियंता किरण काकड, कनिष्ठ अभियंता दिव्या पवार, सहाय्यक अभियंता दिनेश सिंग राजपूत, कनिष्ठ अभियंता नितीन निकम, कनिष्ठ अभियंता प्रदीप भालेराव, निम्नस्तर लिपिक अवधूत मोरे, बाह्य स्त्रोत तंत्रज्ञ वैभव दरेकर, प्रधान-तंत्रज्ञ दत्तात्रय खाडे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.